सकाळ

# फुलवडे परिसराची तहान भागणार !

## बरकीदरा येथील पाझर तलावाची रुंदीकरणासह खोदाई



फुलवडे (ता. आंबेगाव) : बरकीदरा येथील पाझर तलाव.

**फुलवडे, ता. २१ :** बरकीदरा येथील पाझर तलावाचे आतील पोटभाग खोदाई, रुंदीकरण, भरावाचे दगडी पिचिंग आणि भिंतीचा भराव, अशी कामे करण्यात आली. त्यामुळे येथे वर्षभर पाणीसाठा उपलब्ध होणार आहे. या कामासाठी भारत फोर्ज लिमिटेड पुणे यांच्या सीएसआर फंडातून आतापर्यंत सुमारे ३० लाख रुपये खर्च केले असून, अद्याप काही काम होणे बाकी आहे.

फुलवडे (ता. आंबेगाव) परिसरात दरवर्षी सप्टेंबर महिन्यानंतर पाण्याचा तुटवडा निर्माण होत असतो. परंतु, या पाझर तलावामुळे या वर्षी वर्षभर पाणीसाठा उपलब्ध होणार असून, शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. शेतीबरोबरच घरगुती वापरासाठी पाणी उपलब्ध होईल. जनावरांच्या व रानातील पशुपक्ष्यांच्या पिण्याच्या पाण्याचीही सोय होणार आहे. या तलावातील खोदाई व रुंदीकरणामुळे गावातील मुख्य ओढ्यास बारमाही पाणी उपलब्ध झाले. त्यामुळे अन्य वस्त्यांना त्याचा फायदा होणार आहे.

दरम्यान, महाराष्ट्र आरोग्य मंडळ व भारत फोर्ज यांच्या माध्यमातून या परिसरातील पडीक जमिनीचे सपाटीकरणाकरण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्यास २० तास जेसीबी मशिन अल्प दरात उपलब्ध करून दिले. त्यामुळे पडीक जमिनीचे सपाटीकरण झाल्याने त्यात शेतकऱ्यांना पीक घेण्यास मदत झाली आहे. या कामासाठी 'भारत फोर्ज'च्या सीएसआर विभागाच्या प्रमुख लीना देशपांडे, जयदीप लाड, महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे प्रमुख अजय गुजर, प्रकल्प समन्वयक सुरेश काळे, बाळासाहेब बंधारी व कॉन्ट्रॅक्टर रवी चौधरी यांनी सहकार्य केले.

> **या पाझर तलावामुळे पाण्याच्या पातळीत वाढ झाली असून, हे पाणी वर्षभर उपलब्ध होणार आहे. उन्हाळ्यात जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. पडीक जमिनींच्या सपाटीकरणामुळे पिके घेण्यास मदत होणार आहे.**
>
> **- मनीषा नंदकर,**
> सरपंच, फुलवडे (ता. आंबेगाव)